आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ जुलै २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षात भारताचा जीडीपीवाढीचा दर ७ टक्के राहील असा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा सुधारित अंदाज
- सन २०४७ पर्यंत विकसित भारताचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प पूर्ण करण्यात कृषी आणि कृषी संबंधित क्षेत्रं महत्त्वाची भूमिका बजावतील, असा केंद्रीय कृषीमंत्र्यांना विश्वास
- महाराष्ट्रात देवशयनी आषाढी एकादशीचा उत्साह, पंढरपुरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न
- देशभरात आशुरा-ए-मुहर्रम निमित्त श्रद्धा आणि भक्तीपूर्ण कार्यक्रमांचं आयोजन

  **आणि**

- मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर १३ किलोपेक्षा जास्त सोनं जप्त

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने चालू आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठी भारताच्या आर्थिक वाढीचा दर वीस शतांशांनी वाढून ७ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यातही नाणेनिधीने आपल्या वर्ल्ड इकोनॉमिक आऊटलूकमध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचा अंदाज ३० शतांशांनी वाढवून ६ पूर्णांक ८ दशांश टक्के केला होता. संस्थेने नुकत्याच प्रकाशित केलेल्या निरीक्षणात, भारताच्या ग्रामीण भागात खासगी खर्चामध्ये वाढ होण्याच्या

शक्यतेमुळे हा अंदाज वर्तवला आहे. यामुळे भारत ही जगातली सर्वात वेगवान विकासाभिमुख अर्थव्यवस्था असल्याचं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

सन २०४७ पर्यंत विकसित भारताचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प पूर्ण करण्यात कृषी आणि कृषी संबंधित क्षेत्रं महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल व्यक्त केला. नवी दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन परिषदेचा ९६वा स्थापना दिन आणि तंत्रज्ञान दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा असून शेतकरी हा त्याचा आधारस्तंभ आहे, असं सांगून शेतकरी आणि शेती याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य आहे, असं चौहान म्हणाले. यावेळी त्यांच्या हस्ते विविध पिकांचे २५ वाण आणि केवळ शेतकऱ्यांना समर्पित उत्पादनांचं अनावरण करण्यात आलं.

**<><><><><>**

आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबु नायडू यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची काल नवी दिल्ली इथं भेट घेतली. आंध्रप्रदेशची आर्थिक स्थिती आणि नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या चार श्वेतपत्रिकांची माहिती नायडू यांनी शहा यांना यावेळी दिली. आधीच्या सरकारचं आर्थिक गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमतेमुळे राज्याचं नुकसान झाल्याचं नायडू यांनी सांगितलं. राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी राज्य आणि केंद्र मिळून एक सर्वसमावेशक योजना आखेल, असा विश्वासही नायडू यांनी या भेटी दरम्यान व्यक्त केला.

<><><><><>

कोलकता उच्च न्यायालयानं पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि इतर तृणमूल कॉंग्रेसच्या नेत्यांविरुद्ध तात्पुरता प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांच्या विरोधात समाज मध्यमांवर कोणतंही बदनामीकारक आणि चुकीचं वक्तव्य करण्यापासून त्यांना मनाई केली आहे. राज्यपाल हे घटनात्मक अधिकाराचं पद असून त्यावर वैयक्तिक हल्ले होऊ नयेत यावर उच्च न्यायालयानं भर दिला आहे.

<><><><><>

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२४ साठी अर्ज करण्याची मुदत वाढवण्यात आली असून, इच्छुक पात्र व्यक्ती येत्या २१ जुलैपर्यंत आपली नामांकनं शिक्षण मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सादर करू शकतात. त्रिस्तरीय निवड प्रक्रियेतून ५० शिक्षकांची निवड होणार असल्याचं शिक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी CDSCO अर्थात केंद्रीय औषध मानक नियंत्रक संस्थेच्या अधिकाऱ्यांसोबत नवी दिल्ली इथं आढावा बैठक घेतली. आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता राखण्याबाबत नियंत्रण ठेवण्याचं काम CDSCO करते. तत्पूर्वी नड्डा यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत डिजिटल मिशन या योजनांचा आढावा घेतला होता.

**<><><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्रात पंढरपूर इथं वारकऱ्यांची अलोट गर्दी झाली आहे. श्री विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासकीय महापूजा सपत्नीक केली. राज्यात भरपूर पाऊस-पाणी होऊ दे, माझा शेतकरी सुखी-समाधानी राहू दे अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी विठ्ठलचरणी केली. मानाचा वारकरी प्रतिनिधी म्हणून नाशिक जिल्ह्यातील बाळू अहिरे आणि त्यांच्या पत्नी आशा यांना मान मिळाला. आषाढी यात्रेदरम्यान वारकऱ्यांच्या सोयीसुविधांसाठी केलेल्या उपाययोजनांची मुख्यमंत्र्यांनी यावेळी माहिती दिली. दर्शनासाठी व्हीआयपी पेक्षा सर्वसामान्यांना प्राधान्य मिळावं असा आपला आग्रह असल्याचं त्यांनी सांगितलं. पंढरपूरच्या मंदिराचा विकास आराखडा स्थानिकांना विश्वासात घेऊन तयार करत असल्याचं ते म्हणाले.

उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री तसंच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महसूल मंत्री राधकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आरोग्य मंत्री डॉ तानाजी सावंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, यावेळी उपस्थित होते. यावेळी मानाच्या पालख्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आलं

आषाढी यात्रेचा मुख्य सोहळा आज मोठ्या उत्साहात पूर्ण होत आहे. या कार्यक्रमासाठी जवळपास १५ लाखांहून अधिक भाविक पंढरीत दाखल झाले आहेत.

राज्यात इतरत्रही विठ्ठलमंदिरांमधे दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या आहेत. मुंबईत वडाळा इथल्या विठ्ठलमंदिरात भाविकांची गर्दी पहायला मिळत आहे.

<><><><><>

प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी आषाढी एकादशी निमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या. विठ्ठालाचा आशीर्वाद सर्वांवर सदैव राहो तसंच आनंद आणि समृद्धीने भरलेला समाज निर्माण होवो असं समाज माध्यमावर सामायिक केलेल्या संदेशात त्यांनी म्हटलं आहे.

आशुरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागांमध्ये मोठ्या श्रद्धेनं आणि भक्तीभावानं पाळला जात आहे. या दिवशी प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या साथीदारांनी, सत्य, सत्व आणि न्याय या तत्वांसाठी करबलामध्ये  हौतात्म्य पत्करलं होतं. त्या स्मृतीप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जातो.

यानिमित्तानं दिल्लीत जामा मशीद, हजरत निजामुद्दीन, ओखला आणि मेहरौलीसह वेगवेगळ्या ठिकाणी मोहरमच्या मिरवणुका काढल्या जात आहेत. करबला हुतात्म्यांच्या सर्वोच्च बलिदानाला उजाळा देणाऱ्या धार्मिक सभा सुद्धा होत आहेत. वाहतूक पोलिसांनी ताजिया मिरवणुकीबाबत वाहनचालकांसाठी वाहतूक सूचनावली जारी केली आहे. देशात इतरत्रही मोहरमचे ताबूत निघणार असून. या पार्श्वभूमीवर चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

<><><><><>

श्रीलंकेत दांबुला इथं येत्या शुक्रवारपासून सुरू होत असलेल्या आशिया चषक टी-ट्वेंटी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय महिला क्रिकेट संघ काल कोलंबोमध्ये दाखल झाला. हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाची सलामीच्या सामन्यातच कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी गाठ पडणार आहे. 'अ' गटामध्ये भारत आणि पाकिस्तान व्यतिरिक्त संयुक्त अरब अमिराती आणि नेपाळच्या संघांचा समावेश आहे. तर यजमान श्रीलंकेसह मलेशिया, थायलंड आणि बांगलादेश हे संघ 'ब' गटात आहेत.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्र, कोकण आणि गोव्यात पुढल्या तीन दिवसात अति मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तर गुजरात, कर्नाटक, छत्तीसगड, केरळ, ओदिशा, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये पुढचे चार दिवस अति जोरदार पाऊस होईल. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पूर्व राजस्थान, पश्चिम राजस्थान, जम्मू काश्मीर, लडाख, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि उत्तरप्रदेशात हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडणार असल्याचं हवामान विभागाने कळवलं आहे.

**<><><><><>**

सीमाशुल्क विभागाने मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन सुमारे सव्वातेरा किलो वजनाचं सोनं, एक कोटी ३८ लाख रुपये किमतीची इलेक्ट्रॉनिक उपकरणं, आणि सुमारे ४५ लाख रुपये मूल्याचं परकीय चलन जप्त केलं आहे. १० ते १४ जुलैदरम्यान २४ वेगवेगळ्या प्रकरणांमधे ही जप्ती

झाली असून सात जणांना अटक झाली आहे. त्यांची कसून चौकशी होत असल्याचं सीमाशुल्क विभागाच्या सूत्रांनी सांगितलं. हे सोनं कपडे, कागद आणि शरीरावर विविध स्वरूपात लपवून आणलं होतं.

**<><><><><>**

ओमानमधल्या मस्कत इथल्या अली बिन अबी तालीब या मशिदीवर काल झालेल्या कट्टरपंथीयांच्या हल्ल्यात एका पोलीस अधिकाऱ्यासह ९ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर २८ जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यात एक भारतीय जखमी झाल्याची माहिती ओमानमधल्या भारतीय दूतावासाने समाजमाध्यमाद्वारे दिली आहे. ओमानच्या सुरक्षा दलाने केलेल्या प्रतिहल्ल्यात तीन हल्लेखोर मारले गेले आहेत. प्रेषित मोहम्मद यांचे नातु शहीद हुसैन यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पाळल्या जाणाऱ्या **आशुरा** या दिवसाच्या पूर्वसंध्येला लोक जमलेले असताना हा हल्ला झाला. ओमानमधल्या शिया मशिदीवर झालेला हा पहिलाच हल्ला असून इस्लामिक स्टेट या संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.